# पंजाब राज्यातील दोन फरार आरोपी नांदेड पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड-** पंजाबमधील कपुरथळा जिल्ह्यातील सुलतानपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हा करून फरार झालेले आरोपीच्या शोधात पंजाब पोलीस नांदेडात आले होते. त्यानंतर नांदेड पोलिसांनी कारवाई करत या दोन्ही फरार आरोपींना अटक केली आहे.

पंजाब राज्यातील दोन फरार आरोपींना नांदेड पोलिसांनी अटक केली. या आरोपीतांचा शोध घेण्यासाठी पंजाब राज्य पोलीसांचे एक पथक नांदेड येथे दाखल झाले होते. त्यावरुन पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक यांनी खंडणी विरोधी पथकास पंजाब पोलिसांना मदत करुन वरील फरार आरोपीतांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते.

सदर गुन्ह्यातील दोन्ही फरार आरोपीतांची गोपनिय माहिती घेऊन शोध घेतला असता नांदेड शहर परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन त्यांना ताब्यात घेऊन पंजाब पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक, श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाने पार पाडली.

भादंवि कलम ३०७, ३२४, ३२३, ३७९(ब), ४४७, ४४८, ५११, ४३६, ४२७, १४८, १४९ भादंवि सह कलम २५, २७ या गुन्हातील वरील दोन्ही आरोपी पंजाब पोलिसांना हवे होते.

दै. देशोन्नती दि. 15/03/24

# पंजाब राज्यातील दोन फरार आरोपी नांदेड पोलीसांच्या ताब्यात

शोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ गुन्हा दाखल झाल्यानंतर पंजाब राज्यातून फरार झालेल्या दोन आरोपींना नांदेड पोलिसांनी ताब्यात घेऊन पंजाब पोलिसांच्या स्वाधीन केले.

जिल्हा कपुरथला राज्य, पंजाब येथील सुलतानपुर लोधी येथील गुरनं २३५/२०२३ कलम ३०७, ३२४, ३२३, ३७९(ब), ४४७, ४४८, ५११, ४३६, ४२७, १४८, १४९ भादंविसह कलम २५, २७ भाहकामधील दोन फरार आरोपी पंजाब राज्यात गुन्हा करुन नांदेड येथे पळुन आल्याची गोपनिय माहिती मिळाली होती. सदरील आरोपीचा शोध घेण्यासाठी पंजाब राज्य पोलीसांचे एक पथक नांदेड येथे दाखल झाले होते. त्यावरुन पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक यांनी खंडणीविरोधी पथकास पंजाब पोलीसांना मदत करुन वरील फरार आरोपीतांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते.

सदर गुन्ह्यातील दोन्ही फरार आरोपीची गोपनिय माहिती घेऊन शोध घेतला असता नांदेड शहर परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन त्यांना ताब्यात घेऊन पंजाब पोलीसांच्या स्वाधीन केले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणीविरोधी पथकाने पार पाडली.